**स्पे.मु.नं.९३/२००९**

मे.सनराईस हाऊस मेकर्स प्रा.लि. .....वादी

वि.

श्रीमती शांती रेड्डी, वगैरे ....प्रतिवादी.

## :: आदेश निशाणी ६७ वर ::

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.११ याने लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. अर्जात असे नमूद करण्यात आले की, तो भारतीय हवाईदलात कार्यरत आहे आणि त्या ठिकाणी कर्मचारी कमी असल्यामुळे त्यास सुट्टी मिळण्यास अडचण होते. त्यामुळे तो वाद विषयासंबंधी असलेली माहिती हस्तगत करु शकला नाही व त्याचे विद्यमान वकिलांना देऊ शकला नाही. म्हणुन लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास विलंब झालेला आहे. अर्जात त्याने पुढे असे नमूद केले की, लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास एकूण २२२ दिवसांचा विलंब झालेला आहे. सरतेशेवटी त्याने लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास परवानगी दिली नाही तर तो त्याचा बचाव मांडण्यास असमर्थ ठरेल असे नमूद केले आणि अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. अर्जाच्या पाठीमागे वादीने लेखी म्हणणे दाखल केले आणि अर्जास हरकत घेतली. लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास हेतुपुरस्सर प्रस्तुत अर्जदाराने विलंब केला असल्याचे नमूद केलेले आहे. म्हणून अर्ज नामंजूर करण्याची विनंती त्याने केलेली आहे.

४. अर्जातील तथ्य कथन व लेखी म्हणण्याचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्ज दि.२९/०३/२०१० रोजी दाखल केलेला आहे. त्यानंतर वादीतर्फे त्यावर

लेखी म्हणणे दाखल करण्यात आले. तद्‌नंतर वादी व प्रतिवादी आणि त्यांचे विद्यमान वकिल न्यायालयात कधीही हजर झाले नाही. प्रस्तुत प्रतिवादीचे कामाचे स्वरुप विचारात घेता त्यास लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास परवानगी दिली नाही तर तो त्याचा बचाव मांडण्यास असमर्थ ठरेल. तसेच प्रकरणाचा न्यायनिर्णय गुणदोषावर होण्याकरीता आणि सदर अर्ज हा मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे या बाबी विचारात घेता सदर अर्ज प्रतिवादी क्र.११ वर खर्च बसवून मंजूर करणे योग्य ठरेल. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आ दे श ::

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. सदर अर्जाचा खर्च रक्कम रु.४०००/- प्रतिवादी क्र.११ याने द्यावा.

पनवेल.
दिनांक ०८/०२/२०१७

( राजेश क. खोमणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल